ा.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय बा० वा०
ग्र. क्र. ३९४६

IRBK-0103146
IRBK-0103146

# मोत्यांचा मळा




म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय [illegible]

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम [illegible] ७ [illegible] प्रतिदिनी ५ पैसे जा[illegible]

# मोत्यांचा मळा

लेखक

के. नारखेडे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
२९५१७
अनुक्रम
विभाग ...
क्रमांक १०८९
नों. दि.
२-४-५९

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

IRBK-0103146

IRBK-0103146

ठा० म० ३९

.ठ आणे

ह्या गोष्टी बालमित्रांकरितां आहेत. शेवटची गोष्ट कांहींशा प्रौढ विद्यार्थ्यांकरितां आहे. तरीपण मोठ्या माणसांनीं ह्या मळ्याकडे उपेक्षेनें पाहूं नये, अशी थोडीशी अपेक्षा आहे.

हा मोत्यांचा मळा सुंदर आहे कीं नाहीं, हें माझ्या बालमित्रांनीं ठरवायचें आहे. त्यांतील रोपें मीं आणलीं आहेत पण मळ्याची रचना रा. ढवळे ह्यांनीं केली आहे.

हें पुस्तक बालवाचकांना आवडल्यास लवकरच मी "चिमणीचा चारा" पाठविणार आहें.

के. नारखेडे

भुसावळ,
अक्षय्यतृतीया, १८६६

सर्वाधिकार प्रकाशकाधीन

प्र थ मा वृ त्ति : १९४४
पु न र्मु द्र ण : १९४९

मु द्र क : बा ग. ढ व ळे
क र्ना ट क मु द्र णा ल य
१०३, शींव (पूर्व), मुंबई २२

प्रकाशक : के. भि. ढवळे
श्री स म र्थ-स द न,
गि र गां व, मुं ब ई ४

## अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| मोत्यांचा मळा | ... | ३ |
| हसरें तळें | ... | ७ |
| जगाचा राजा | ... | ११ |
| सूर्यदेवाची मुलगी | ... | १६ |
| चांदण्याच्या गोष्टी | ... | २१ |
| समुद्राचीं मुलें | ... | २५ |
| देवकळा | ... | २९ |
| नदीताई | ... | ३५ |
| काळें सोनें | ... | ३९ |
| पांढरा कागद | ... | ४४ |
| नवीन | ... | ४७ |

३१४९

# मोत्यांची माळा

झाडांचीं फळें व कंदमुळें खाऊन मनुष्य राहात असे, त्या काळची गोष्ट आहे. बरींच वर्षें पाऊस न पडल्यामुळें झाडें सुकलीं, कंदमुळें जळून गेलीं. खायला मिळावें म्हणून माणसें सैरावैरा भटकूं लागलीं. कोठेंच कांहीं मिळेना. तीं तळमळूं लागलीं.

एक मनुष्य समुद्राच्या कांठानें भटकत होता. बऱ्याच दिवसांत खायला न मिळाल्यामुळें तो व्याकुळ झाला होता. त्याचे पाय कष्टानें पडत होते. शेवटीं त्याच्या डोळ्यांसमोर अंधारी आली. झोंक जाऊन तो जमिनीवर पडला. त्याची शुद्धि गेली.

संध्याकाळ झाली. सूर्य मावळला. हळुहळू अंधार पसरूं लागला. तो मनुष्य तसाच समुद्राच्या किनाऱ्यावर पडला होता.

मध्यरात्र झाली. जिकडे तिकडे भयाण शांतता पसरली होती. हळूच एका जलदेवतेनें पाण्यांतून वर डोकें काढलें. ती समुद्राच्या पृष्ठभागावर आली.

चारी बाजूंना प्रकाश पसरला. तिच्या केसांवरून मोत्यें ओघळत होतीं. तिच्या गळ्यांत मोत्यांचे कंठे होते. हातांपायांवर मोत्यांच्या माळा होत्या. सर्व शरीरावर मोत्येंच मोत्यें होतीं. जणुं तिच्या अंगावर मोत्यांच्या चांदण्या जडविल्या होत्या. मोत्यें झेलीतच ती समुद्रावर फिरूं लागली.

एकाएकीं तिची नजर कांठावर पडलेल्या त्या माणसाकडे गेली. तिनें त्याच्याकडे टक लावून पाहिलें. तिनें पाण्यांत बुडी मारली.

ओंजळभर मोत्यें घेऊन ती वर आली. त्या माणसाच्या हातांजवळ, पायांजवळ व अंगावर तिनें तीं सर्व मोत्यें पसरलीं. पुढें काय होतें तें पाहाण्याकरितां ती जवळच पाण्यांत जाऊन लपून बसली.

सकाळचा गार वारा वाहूं लागला. तो मनुष्य उठून बसला. त्याच्या अंगावरील मोत्यें घळघळून खालीं पडलीं. त्याच्याभोंवतीं मोत्यांचा सडा घातला गेला.

खाण्याचा जिन्नस समजून त्यांतलीं मूठभर मोत्यें त्यानें एकदम तोंडांत टाकलीं. तो तीं चावायला लागला. दांत तुटल्यासारखें त्याला वाटलें. त्यानें तीं थुंकून टाकलीं.

तो अधिकच निराश झाला. त्यानें जमिनीवर अंग टाकलें. तो पुन्हा उठलाच नाहीं.

इतक्यांत एक उपाशी गाय त्या ठिकाणीं धडपडत आली. मोठ्या आशेनें तिनें त्या मोत्यांचा घास घेतला. तिच्या तोंडांतून सगळीं मोत्यें बाहेर आलीं. तिचे डोळे थिजले. त्या माणसाच्या मानेवर तिनें मान टेकली.

चमकणारे मोत्यांचे दाणे पाहून दोन तीन पाखरें कष्टानें उडत त्या ठिकाणीं आलीं. त्यांनीं ते दाणे चोंचींनीं टिपून घेतले, पण ते लागलीच खालीं पडले.

जलदेवता सारें पाहात होती. तिला फार वाईट वाटलें. अंगावरचीं सर्व मोत्यें तिनें फेंकून दिलीं.

समुद्राच्या तळाशीं न जातां ती वर आकाशांत देवाकडे गेली.

"देवा, हीं मोत्यें काय कामाचीं? ह्यांनीं भूक जात नाहीं. व्याकुळ जीव शांत होत नाहीं. गेलेली शक्ति परत येत नाहीं. हीं कशाला उत्पन्न केलीं?" ती देवाला म्हणाली.

"मग तुझें काय म्हणणें आहे?"



"हीं खातां आलीं पाहिजेत. ह्यांनीं शक्ति आली पाहिजे. भुकेनें व्याकुळ झालेला जीव शांत झाला पाहिजे."

"ठीक आहे, पण तसें केलें तर तुला त्रास होईल थोडासा. चालेल?"

"हो, चालेल."

देवानें हसत हसत जलदेवतेकडे पाहिलें.

तिचें रूप पालटलें. आकाशांत एक मोठा मेघ दिसूं लागला. त्याच्या पोटांत ती हसूं लागली.

खालीं पसरलेल्या मोत्यांवर त्या मेघांतून सर सर पाऊस पडूं लागला.

मोत्यांना कोवळे अंकुर फुटले.

मेघांतून पाऊस पडतच होता.

अंकुरांचीं मोठीं ताटें झालीं.


त्यांना कणसें आलीं. मोत्यांचा मळा पिकला.

प्रत्येक कणसांत मोत्यांचे दाणे खच्चून भरले होते.

ते दाणे उपाशी जीवांकरितां होते. भुकेनें व्याकूळ झालेल्यांची भूक त्यांनीं दूर होऊं लागली. त्यांच्या ताटांनीं गाईगुरांचें पोट भरूं लागलें.

दिवाळीच्या दिवसांत आपण रानांत फिरावयास गेलों, तर रस्त्याच्या बाजूनें आपणांस असे किती तरी मोत्यांचे मळे दिसतील.

शेतकरी त्यांना मोत्यांचे मळे म्हणत नाहींत. जीवनाला उपयोगी असणाऱ्या त्या दाण्यांची निरुपयोगी मोत्यांबरोबर तुलना केलेली त्यांना आवडत नाहीं. ते त्या शेताला कडब्याचें शेत म्हणतात व त्या दाण्यांना दाणे अगर जोंधळे म्हणतात.




त्या तळ्यांत खूप चिखल होता. त्याचें पाणी हिरवें-निळें होतें. पाण्यांत वेड्यावाकड्या वेली अस्ताव्यस्त पसरल्या होत्या. जिकडेतिकडे शेवाळ माजलें होतें. कांठावर कांटेरीं झुडपें वाढलीं होतीं.

त्याच्याकडे पाहून सारे नाक मुरडीत.

लोक येत, ते दुरूनच परत जात.

गाईवासरें येत, तीं पाण्याकडे पाहातांच माघारीं वळत.

पाखरें त्यावरून भिरभिरत जात, पण क्षणभरहि कांठावरच्या झुडपांवर थांबत नसत.

त्याला फार वाईट वाटूं लागलें.

“आपला कोणालाच उपयोग नाहीं. कोणाची तहान आपल्या पाण्यानें भागत नाहीं. शेवाळामुळें कोणाचा पाय कांठावर ठरत नाहीं. वेलींनीं गाईवासरांचें पोट भरत नाहीं. कांठावरच्या झुडुपांचीं फळें-फुलें कोणाला आवडत नाहीं. फुकट आहे आपलें हें जिणें!”

त्याचें हृदय तळमळूं लागलें.

कोणींतरी यावें, आपल्याला भेटावें, आपल्या कांठावर खेळावें, आपण त्याच्या उपयोगीं पडावें, असें त्याला फार फार वाटे.

पण कोणी त्याच्याकडे ढुंकूनही पाहीना.

मोठ्या आशेनें तें चारी दिशांकडे पाहात असे. हसणाऱ्या उषेबरोबर त्याला आशा वाटूं लागे, कीं कोणीतरी येईल! पण

वाढत्या उन्हानें त्याची आशा करपूं लागे व मावळणाऱ्या सूर्याबरोबर ती नाहींशी होई.

भोंवतीं पसरलेल्या अंधाराप्रमाणें त्याच्या हृदयांतही अंधार पसरे. तें दुःखानें हुंदके देई. पण ते ऐकण्यास जवळपास कोणी नव्हतें. एके रात्रीं एक वनदेवता जवळून जात असतां तिला त्याचे हुंदके ऐकूं आले. ती थांबली व त्याच्याजवळ गेली. मंजुळ स्वरांत तिनें विचारलें,

"कां रडतोस तूं? कोणत्या दुःखानें तळमळतोस असा?"

गोड स्वरांतील तो प्रश्न ऐकतांच अश्रु पुसून त्यानें समोर पाहिलें. वनदेवतेला पाहातांच त्याला थोडेंसें समाधान वाटलें. रडें आवरून तें म्हणालें,

"देवी, माझें पाणी घाणेरडें असल्यामुळें तें कुणाला पितां येत नाहीं. इतर नद्या व तलाव प्राण्यांना पाणी देतात. त्यांच्या पाण्यानें पिकें येतात. झाडांना फळें-फुलें येतात. लोक प्रेमानें त्यांच्याकडे जातात. माझा कोणाला उपयोग नाहीं. माझ्याजवळ कोणी येत नाहीं. मी दिसायला ओंगळ आहें. माझें हृदय चिखलानें भरलें आहे. देवी, मी कसा लोकांच्या उपयोगीं पडेन? काय करूं म्हणजे लोक मजजवळ येतील? माझ्या हृदयांतील हा चिखल, ही घाण कशी नाहींशी होईल?"

वनदेवता मधुर स्वरांत म्हणाली,

"तूं ओंगळ दिसतोस, पणं तुझें हृदय पवित्र आहे. दुसऱ्याच्या उपयोगीं पडण्याची तळमळ तुझ्या अंतःकरणाला लागलेली असल्यामुळें ह्या चिखलानें तुझें मन गढूळणार नाहीं. सगळे लोक तुझ्याकडे येतील. तुला पवित्र मानतील. देव सुद्धा तुझ्या कांठावर येऊन राहील. दुसऱ्याची सेवा करण्याची तुझी ही वृत्ति सर्वांना तुझ्याकडे आणील. तुझें थोर हृदय पाहून मला फार आनंद झाला. मी येथेंच राहीन."

वनदेवतेनें तळ्यांत उडी घेतली. तळ्यांत एक नवीनच वेल वाढूं लागली. थोड्याच दिवसांत त्या वेलीला सुंदर कमळें आलीं. तीं



वाऱ्यावर डोलत होतीं, आनंदानें नाचत होतीं. मजेनें हसत होतीं. त्यांचा सुवास दूरवर पसरला.

दुरून जाणारा कोणी प्रवासी त्या वासानें मोहित होऊन तळ्याजवळ आला.

हसरीं-नाचरीं कमळें पाहून तो आनंदानें बेभान झाला. गांवांत जाऊन सगळ्यांना त्यानें ही गोष्ट सांगितली.

लोकांच्या झुंडीच्या झुंडी तळ्याकडे येऊं लागल्या. चित्रकार आला, त्यानें त्या हसऱ्या कमळांचें चित्र काढलें.

कवि आला, त्यानें त्यांचें सौंदर्य आपल्या कवितेंत वर्णिलें.

एक भाविक आला, आजूबाजूंचीं झुडपें काढून कांठावरची जागा त्यानें साफ केली. तेथें एक सुंदर देऊळ बांधलें. पाण्यापर्यंत दगडी घाट तयार केला.

आतां कितीतरी लोक सकाळ संध्याकाळ त्या तळ्याकडे येतात. तळ्यांतील कमळें काढून तीं घाटावरच्या देवाला ते भक्तीनें वाहातात. कांठावर लावलेल्या वृक्षांखालीं ते विसांवा घेतात.

तळ्याची इच्छा पूर्ण झाली. देवपूजेला आपलीं कमळें लोक नेतात, हें पाहून त्याला फार आनंद होऊं लागला.

तें आतां नेहमीं हसत असतें.



गोजिरवाणीं पांखरं वाऱ्यावर नाचत आहेत.

वृक्षवेली फळाफुलांनीं नटल्या आहेत.

चित्रविचित्र फुलपांखरं फुलांफुलांवर गुणगुणत खेळत आहेत.

नद्या-ओढे हर्षानें नाचत गात आहेत.

सृष्टि हिरवा-निळा शालू पांघरून डोलत आहे.

विशाल पर्वत आकाशांत आपलीं शिखरं उंचावरून मिरवीत आहेत.

अगाध सागर फेसाळलेल्या लाटांनीं हसत आहेत.

समुद्राच्या पाण्यांत नानाप्रकारचे जलचर विहरत आहेत.

वनावनांतून लाखों प्राणी फिरत आहेत.

बुद्धिमान् माणसं सृष्टीला भूषवीत आहेत.

असं सुंदर जग निर्माण करायचं देवांच्या मनांत आलं.

आणि देवाच्या मनांत कल्पना येतांच ती पूर्ण होण्याला किती वेळ लागणार ?

त्या जगाची व्यवस्था करण्याकरितां कोणाला तरी राजा करायचं देवानें ठरवलं.

एवढ्या विशाल जगाची व्यवस्था करायला फार बलवान राजा हवा होता.

आकाशांत सूर्य व आणखी सूर्यासारखे तेजोगोल होते.

त्या प्रत्येकाच्या मनांतून राजा व्हावं असं होतं. "मी सृष्टीचा राजा होईन, मी सृष्टीचा राजा होईन," प्रत्येक तेजोगोल देवाकडे जाऊन सांगूं लागला.

सर्वच तेजस्वी होते. कोणाची निवड करावी ?

देवानें त्यांना सांगितलं, "जो सर्वांत पराक्रमी असेल त्याला जगाचं राजपद मिळेल. त्याला सर्व सृष्टीची नीट व्यवस्था करतां आली पाहिजे. तुम्ही आपसांत ठरवा, कोणीं राजा व्हावं तें."


प्रत्येकाला राजा होण्याची इच्छा होती. त्यांचं एकमत होईना.

शेवटीं त्यांच्यामध्यें लढाई सुरू झाली. ते एकमेकांवर त्वेषानें तुटून पडले.

सूर्यदेव फार पराक्रमी ! त्यानें सर्व तेजोगोलांना दूरदूर पळवून लावलं.

ते आकाशाच्या पोकळींत दूर जाऊन लपून बसले.

सूर्यदेव आकाशांत नसला, म्हणजे ते हळूच आकाशांत डोकावतात. भीत भीतच आकाशाच्या अंगणांत येतात. तरी पण सूर्यदेवाची त्यांना इतकी भीति वाटते, कीं ते सारखे थरथरत असतात. सूर्यदेव येणार असं दिसतांच ते सर्व लपून बसतात. सूर्यदेव नसला म्हणजे मात्र सर्व आकाश त्यांनीं भरून जातं. आपण त्यांना तारे म्हणतों. कसे चमचम करतात ते रात्रीं ! ते सूर्यासारखेच आहेत, पण खूप खूप दूर असल्यामुळं अगदीं लहान दिसतात.



सूर्यदेव फार पराक्रमी ! त्यान सर्व तेजोगोलांना दूर दूर पिटाळून लावलं.

सूर्यदेवानें आपल्या पराक्रमामुळं जगाचं राजपद मिळवलं.

देवाच्या इच्छेप्रमाणं सर्व जगाची व्यवस्था करण्याला त्यानें सुरुवात केली.

सकाळीं उठला, कीं तो कामाला लागे. सर्व दिवसभर तो सारखा काम करीत राही. एकसारखं काम केल्यामुळं संध्याकाळीं तो अगदीं थकून जात असे.

अंग टाकतांच त्याला गाढ झोप लागे. रात्रभर तो झोप घेई.

मोठ्या उत्साहानें तो पुन्हा कामाला आरंभ करीत असे.

आपल्या राज्याची व्यवस्था चांगली राहावी, म्हणून त्यानें कांहीं नियम केले.

आपल्याबरोबर सर्वांनीं उठावं. उठल्यावर आपल्याप्रमाणें सर्वांनीं दिवसभर काम करावं व आपण निजल्यावर सर्वांनीं निजावं.

पण त्याचे नियम न पाळणारे कांहीं प्राणी निघाले.

तो झोपीं गेला, कीं ते त्याच्या राज्यांत गोंधळ घालीत. त्याची प्रजा झोपली, कीं ते लुटालूट करीत व तिला त्रास देत. कांहीं क्रूर पशु अंधारांत त्याच्या गरीब प्रजेवर हल्ला करून तिला ठार मारीत.

दिवसभर काम केल्यामुळं सूर्यदेव इतका थकत असे, कीं रात्रीं त्याला कामच करतां येत नसे.

त्याला मोठा विचार पडला. फार काळजी लागली. सूर्यदेवाच्या आईनें त्याला सांगितलं, "हें काम तूं आपल्या भावाकडे, चंद्राकडे सोपव. तो तें काम सहज करील."

सूर्यदेवाला आपल्या भावाची खात्री वाटेना. तो सूर्यदेवासारखा पराक्रमी नव्हता. तो फार आळशी होता.

नियमानें काम करणं त्याला ठाऊक नव्हतं. सूर्याप्रमाणें तो तेजस्वी नव्हता व पराक्रमीही नव्हता.

पण आईच्या आग्रहामुळं सूर्यदेवानें रात्रीचं काम चंद्राकडे सोपविलं.

सूर्यदेवानें आपलं तेज त्याला दिलं. पण चंद्राकडून आपलं काम नियमितपणें होईना. तो केव्हां तरी येई व कसं तरी आपलं काम करी. सूर्यदेवानें त्याला पुष्कळ सांगितलं, पण त्याचा कांहींच उपयोग झाला नाहीं.

महिन्यांतून एक दिवस तो आपलं काम मनापासून करतो; पण नंतर त्याचा अनियमितपणा सारखा वाढत जातो. शेवटीं तर तो इतका वाढतो, कीं पंधरा दिवसांनीं तो एक दिवस गैरहजरच राहातो. पुन्हा भावाच्या भीतीमुळें व आईच्या सांगण्यावरून तो कामाला सुरुवात करतो. त्याला आपल्यावर सोपविलेलं काम पार पाडतां येत नाहीं.


आईच्या आग्रहामुळें आपल्या आळशी भावाकडे सूर्यदेवाला दुर्लक्ष करावं लागतं.

रात्रीची व्यवस्था चांगल्या रीतीनें नियमितपणें करणारा कोणी तरी मिळावा म्हणून सूर्यदेव सारखा फिरत असतो. आपल्या शेकडों डोळ्यांनीं जग धुंडाळीत असतो.

अजूनही त्याला तसा कोणी आढळत नाहीं. त्यामुळें अजूनही रात्रीं अंधारच असतो व रात्रीचा बंदोबस्त नीट होत नाहीं.

किती दिवस सूर्यदेवाला असं फिरावं लागणार कुणाला ठाऊक! तो जगाचा राजा आहे, पण त्याला सारखं वणवण फिरावं लागतं.

---



**फार** फार पूर्वीची एक गोष्ट आज मी तुम्हांला सांगणार आहें.

सूर्यदेव आकाशांत फिरत होते. त्यांच्या रथाला सात घोडे होते. ते सुंदर व चपळ होते. सूर्यदेवाचें तेज फारच विलक्षण होतें. त्यांचें तेज पाहून सगळे दिपून जात. कोणीही त्यांच्याजवळ जाऊं शकत नसे.

सूर्यदेवाच्या मुलांना सुद्धा त्यांचें तेज सहन झालें नाहीं. ते त्यांना सोडून दूर दूर गेले.

सूर्यदेवाची एक चिमुकली मुलगी मात्र त्यांच्याजवळ राहिली. ती नेहमीं बापाच्या रथांत खेळत असे. तिला सुद्धा बापाच्या तेजामुळें त्रास होत असे, पण ती तो मुकाट्यानें सहन करी.

सूर्यदेवाच्या रथांतून आकाशाची शोभा फार मनोहर दिसत असे. आकाशांत टिकल्यांचें झुंबर टांगलेलें होतें. सोनेरी रुपेरी मेघ आकाशांत फिरत होते. आकाशगंगेचा थाट तर विशेषच होता. हिरे-माणकांनीं तिचें पात्र खचून भरलें होतें. इंद्रधनुष्याचे रंग पाहून तर डोळ्यांची कधींच तृप्ति होत नसे.

सूर्याच्या मुलीला वाटलें, आपण रथाबाहेर जावें. आकाशांत इकडे तिकडे फिरावें. आकाशगंगेंतील रत्नें वेचावीं. मेघांमधून बागडावें. आकाशांतील इंद्रधनुष्यावर नाचावें.

ती सूर्यदेवाला म्हणाली, "बाबा, मी तुमच्या रथांतच नेहमीं खेळतें. तुम्ही मला कुठें फिरायला जाऊंच देत नाहीं. आकाशाचें अंगण किती मजेदार आहे! जाऊं का मी जरा बाहेर खेळायला?

"नाहीं बाळ, तूं माझ्यापासून दूर जाऊं नकोस. हें आकाशाचें अंगण फार मोठें आहे. तूं चुकशील व कुठेंतरी जाशील. तूं माझ्याजवळ ह्या रथांतच खेळ." सूर्यदेव म्हणाले.

"जा! तुम्ही माझी हौस नाहींच पुरवणार! तुमच्या तेजामुळें मला किती तरी त्रास होतो! मी सारखी होरपळून निघतें. पण तुम्हांला काय त्याचें! तुम्ही आपल्या पराक्रमांत चूर!" मुलगी चिडून म्हणाली.

मुलीचें बोलणें ऐकून सूर्यदेवांना फार राग आला. आपल्या मुलीनें आपल्याला दोष द्यावा! आपल्या पराक्रमाला हिणवावें! आपल्याजवळ राहाण्याचा कंटाळा करावा!

कशाला हवी अशी मुलगी? जाऊं दे तिला कुठेंही! तिला बापाची पर्वा नाहीं, तर बापानें तरी तिची पर्वा कां करावी? ह्या विचारानें सूर्यदेव चिडले.

ते रागानें मुलीला म्हणाले, "ठीक आहे! जा. माझ्या तेजाचा तुला त्रास होतो, नाहीं? तुला वाटत असेल, आपणही तेजस्वी आहों. आपण स्वतंत्रपणें आकाशांतून फिरूं. आपल्याला पित्याच्या जवळ राहाण्याची जरूर नाहीं. पण हा तुझा भ्रम आहे. मींच तुला तेज व प्रकाश हीं दिलीं आहेत. तुला रथाबाहेर दूर जायचें ना! जा. ह्यापुढें मी तुला रथांत घेणार नाहीं. मी तुला दिलेलें तुझें तेज, तुझा प्रकाश, तूं दूर गेल्याबरोबर नाहींसा होईल."

सूर्यदेवांनीं मुलीला शाप दिला.

मुलगी फार घाबरली. ती थरथर कांपत पित्याला म्हणाली, "बाबा बाबा. असे काय रागावतां? मी लहान आहें. माझी चूक झाली. मला क्षमा करा. मी तुमच्यापासून दूर कशी जाऊं? कुठें जाणार मी तुम्हांला सोडून?"

मुलीच्या भाषणानें सूर्यदेव शांत झाले. रागाच्या भरांत आपण आपल्या मुलीला शाप दिला म्हणून सूर्यदेवांना वाईट वाटलें.

“ बाबा, तुम्ही क्षमा नाहीं का करणार मला ? ”

“ बाळ, सूर्यदेवाचा शब्द कधींच खोटा होत नाहीं. तूं दूर गेल्यावर तुझा प्रकाश, तुझें तेज नाहींसें होईल. तुझ्याभोंवतीं गाढ अंधार पसरेल. तुला माझ्या रथांत कधींच येतां येणार नाहीं. त्याला आतां इलाज नाहीं. ”


“ माझ्याकरितां आपण कांहींच करणार नाहीं का ? थोड्याशा चुकीकरतां तुम्ही आपल्या मुलीला एवढी का शिक्षा करणार ? तुम्ही इतक्या कठोरपणानें का आपल्या मुलीशीं वागाल ? ”

सूर्यदेवांना वाईट वाटत होतेंच. जरा विचार करून ते म्हणाले, “ तुझा प्रकाश नाहींसा झाला, तरी मी तुला प्रकाश देत जाईन. बाहेरून तुझें तेज नाहींसें होईल, पण तुझ्या शरीरांत तुझें तेज कायम राहील. ”

“ बाबा, मला तुमच्याकडे येतां येणार नाहीं का ? दूर दूर मी एकटीच फिरणार? आकाशाच्या ह्या अफाट पसाऱ्यांत मला तुमचा आधार मिळणार नाहीं ? ”

“ बाळ, तुला एकटीलाच फिरावें लागेल. तूं माझ्याजवळ येऊं शकणार नाहींस. पण मी तुला माझ्यापासून फार लांब जाऊं देणार नाहीं. तुला मी एक वर देतों. तुला मुलें होतील. तीं तुझ्या अंगा-खांद्यावर नाचूं बागडूं लागतील. त्यांपैकीं कांहीं मुलें फार बुद्धिमान निघतील. तूं त्यांची माता आहेस हें त्यांना कळेल. आपल्या मातेला ते फार पूज्य मानतील. तुझ्याकरितां ते प्राणही द्यावयास तयार होतील.

तूंही त्यांना सुखी करण्याचा प्रयत्न कर. जरी तूं दूर गेलीस तरी तुला माझं नेहमीं दर्शन होईल."



"बाबा, आज तुमचा मीं अपमान केला. तुम्हांला टाकून बोललें. तुमच्यासारख्या थोर पित्याला दोष दिला. तुमच्याभोंवतीं

कितीही प्रदक्षिणा केल्या, तरी माझ्या चुकीची भरपाई होणार नाहीं. मी नेहमीं तुमच्याभोंवतीं फिरेन. मग जाईल ना तुमचा राग?"

"वेडी! माझा राग केव्हांच गेला! पण तुला समाधान वाटत असेल तर फिरत जा माझ्याभोंवतीं. त्यामुळें तूं फार लांबही जाणार नाहींस माझ्यापासून."

ती मुलगी बापाचा निरोप घेऊन निघाली. पहिल्यानें बापाप्रमाणेंच ती तेजस्वी होती; पण पुढें तिचें तेज कमी कमी होऊं लागलें. ती काळी पडूं लागली. बापाचा अपमान केल्याबद्दल ती त्याच्याभोंवतीं सारखी प्रदक्षिणा घालूं लागली. अजूनही सूर्यदेवाभोंवतीं ती प्रदक्षिणा घालीत आहे.

ती सूर्याची मुलगी म्हणजे आपली पृथ्वी; तिचीं मुलें म्हणजे पृथ्वीवरचे प्राणी; आणि तिचीं बुद्धिमान् मुलें कोणतीं बरें? तीं मुलें म्हणजे आपण माणसें.

---

# चांदण्याची गोष्ट

सूर्य मावळला, कीं हळूच एकादी चांदणी बाहेर डोकावून पाहूं लागे. नंतर दुसरी येई, तिसरी येई. हळुहळू पुष्कळ चांदण्या आकाशांत जमत व आकाशाच्या निळ्या अंगणांत खेळूं लागत. कांहीं झिम्मा खेळत, कांहीं लपंडाव खेळत, कांहीं पाठशिवणीचा खेळ खेळत, कांहीं डोळे मिचकावून एकमेकींना गालांतल्या गालांत हसत.

रात्रभर त्या सारख्या नाचत, हसत, खेळत असत. पहिल्यानें त्यांना त्यांत फार मौज वाटे. पण लवकरच कांहीं चांदण्यांना हे खेळ आवडेनासे झाले. तेच खेळ, तेंच अंगण, त्याच मैत्रिणी. त्या अगदीं कंटाळून गेल्या.

एकदां एका चांदणीला पृथ्वी दिसली. तिनें ती दुसरीला दाखविली. दुसरीनें तिसरीला दाखविली. थोड्याच वेळांत सर्वजणी पृथ्वीकडे मोठ्या कौतुकानें पाहूं लागल्या.

"तेथें काय असेल ग?" एकीनें विचारलें.

"त्या ठिकाणीं आपल्याला जातां येईल का? येथें अगदीं कंटाळा आला बाई!" दुसऱ्या कांहीं म्हणूं लागल्या.

"छे बाई! इतक्या दूर........"

"अहा ग भागुबाई! काय हरकत आहे तेथें जायला? चला, आपण देवबाप्पाला विचारूं."

कांहीं धीट चांदण्या घरांत गेल्या. आंत देवबाप्पा बसले होते. त्या त्यांना म्हणाल्या, " देवबाप्पा, आम्हांला या आपल्या अंगणांत खेळायचा कंटाळा आला आहे. आम्हांला त्या पृथ्वीवर जावेंसें वाटतें. जाऊं का आम्ही तेथें ? "

" नाहीं बाळांनो, तुम्ही येथेंच मजजवळ राहा. तेथें तुम्हांला त्रास होईल. "

" होऊं दे झाला तर त्रास! आम्हांला येथें अगदींच करमत नाहीं. पण तुम्ही आमची हौस नाहींच पुरविणार ! " एक चिटुकली चांदणी गाल फुगवून म्हणाली.

देवबाप्पाच्या बोलण्यानें चांदण्या हिरमुसल्या. त्यांच्या मुखाच्या कळ्या कोमेजल्या. त्यांच्या डोळ्यांत आंसवें गोळा झालीं.

त्यांच्याकडे पाहून देवबाप्पा म्हणाले,

" तुम्हांला तेथें जातां येईल, पण तुमचें रूप पालटेल. तेथें गेलांत, कीं तुम्हांला पुन्हा येथें यावयास मिळणार नाहीं. दरवर्षी तुम्हांला नवा नवा जन्म घ्यावा लागेल. बोला, जायचें आहे का तेथें ? "

" वा ! नवा नवा जन्म ! मग मौज वाटेल आम्हांला ! इथें येतां येणार नाहीं ना ! आम्हांला कोठें यायची इच्छा आहे ! आम्हांला अगदीं कंटाळा आला आहे इथें राहायचा ! " चांदण्या म्हणाल्या.

"...आणि हें पाहा, तेथें माझीं आवडतीं मुलें आहेत."

" मग तर खूपच मजा येईल. आम्ही तेथें त्यांच्याबरोबर खेळूं. पाठवाच आम्हांला तेथें ! " त्या हट्ट धरून बसल्या.

"ठीक आहे. पण तुम्हांला माझ्या मुलांबरोबर खेळायला मिळणार नाहीं. वाऱ्याबरोबर फक्त तुम्ही खेळाल. जा तुम्ही. तुमच्यामुळें माझी मुलेंही अधिक सुखी होतील. त्यांना तुमचा उपयोग होईल." देवानें त्यांच्या पाठीवरून हात फिरविला व त्यांना निरोप दिला.

चांदण्या हसत हसत पृथ्वीवर आल्या.

एका शेतांत कांहीं झुडपें होतीं त्यांवर त्या उतरल्या व हसत नाचत खेळूं लागल्या.



एक माणूस फिरत फिरत त्या शेताकडे आला. शेतांतील लहान लहान झुडपांवर चांदण्या चमकत होत्या.

"अहाहा ! काय चांदण्या फुलल्या आहेत." त्याच्या तोंडून उद्गार आले. त्यानें त्या चांदण्या गोळा केल्या. त्यानें त्यांचा

मोठा ढीग केला. त्याला तो कापूस म्हणूं लागला. चांदण्यांच्या शेतालाच 'कापसाचें शेत' असेंही नांव मिळालें.

माणसानें कापसाचे कपडे बनविले.

त्या कपड्यांमुळें थंडीवाऱ्यापासून माणसाचें रक्षण होऊं लागलें. तो अधिक सुखी झाला. आपला माणसाला उपयोग होऊं लागला, हें पाहून चांदण्यांनाही आनंद झाला. त्यांना आतां निळ्या आकाशाची आठवणही होत नाहीं. आपलें हिरवें शेतच त्यांना आवडूं लागलें.

कापसाच्या शेतांत तुम्ही गेलांत, कीं ह्या हसणाऱ्या चांदण्या तुम्हांला दिसतील व नाचत डोलत त्या आपली ही गोष्ट तुम्हांला सांगतील.

---

# समुद्राचीं मुलें

फार पूर्वी सूर्याचें तेज अतिशय प्रखर होतें. त्याच्या तापानें पृथ्वी अगदीं होरपळून जात असे. तिच्या अंगाची आग आग होई. ती व्याकुळ होऊन दुःखानें तळमळूं लागे.

शेवटीं तिला आपलें दुःख असह्य झालें. ती सूर्याला शरण जाऊन त्याची प्रार्थना करूं लागली. दीनवाणीनें तिनें त्याची करुणा भाकली.

सूर्याला तिची कींव आली.

तो तिला म्हणाला, "माझें तेज तर असेंच राहाणार! पण तूं तापून व्याकुळ झाल्यावर तुला शांत करून तुझा ताप दूर करण्याची मीं व्यवस्था करितों."

सूर्यानें आपल्या किरणांना समुद्राकडे पाठविलें. त्यांनीं सूर्याचा निरोप समुद्राला कळविला.

"तुझीं मुलें पाठवून तापलेल्या पृथ्वीला शांत कर."

समुद्र आपलीं मुलें द्यावयाला तयार होईना.

सूर्याला फार संताप आला. त्यानें आपले सर्व किरण समुद्रावर फेकले. त्यांच्या पराक्रमानें समुद्र व्याकुळ झाला, घाबरला व सूर्याचें म्हणणें त्यानें मान्य केलें.

त्यानें आपलीं मुलें—ढग—सूर्याला दिलीं.

सूर्यानें ढगांना पृथ्वीवर जाऊन तिला शांत करण्याची आज्ञा केली.

पण तीं मुलें फार खट्याळ होतीं. तीं मनांत म्हणालीं, " आपण वाटेल तो आकार धारण करूं शकतों. विशाल काळेकुट्ट स्वरूप प्राप्त करून घेऊं शकतों. आपला पिता सूर्याला भ्याला, पण आपण सूर्याची खोड मोडूं. सूर्याचें तेज नष्ट करून पृथ्वीऐवजीं आपण त्यालाच शांत करून टाकूं."

हे विचार मनांत येतांच त्यांनीं खूप विशाल देह धारण केले. काळेकुट्ट ढग पृथ्वीवर येण्याऐवजीं सूर्यावर चाल करून गेले. ते वर वर जाऊं लागले. त्यांनीं सर्व आकाश व्यापलें. सूर्याला झांकलें. त्यांना वाटलें, चांगली खोड मोडली आपण सूर्याची! अत्यानंदानें बेहोष होऊन आकाशाच्या अंगणांत तीं थैमान घालूं लागलीं.

प्रथम सूर्यराजहि थोडासा गांगरला. हीं समुद्राचीं मुलें इतकीं बेफाम होतील ही कल्पना त्याला नव्हती. तो असावध होता.


लवकरच तो सावध झाला. खट्याळ ढगांना शिक्षा करण्याकरितां आपला एक तेजस्वी किरण त्यानें पाठविला. त्याला त्यानें सांगितलें, " ह्या बंडखोर मेघांना खूप झोडपून काढ व त्यांना पृथ्वीवर पाठव. ते फार खट्याळ आहेत. एकदां शिक्षा झाल्यानें ते कधींच ताळ्यावर येणार नाहींत. तूं नेहमीं त्यांच्यामध्यें राहा व जेव्हां जेव्हां ते ऐकणार नाहींत तेव्हां तेव्हां त्यांना फटकारे मारून पृथ्वीवर पाठवीत जा."

तो लखलखणारा तेजस्वी किरण सूर्यापासून निघाला. त्यानें एकदम मेघांच्या अंगावर उडी घेतली व त्यांना फटकारे मारायला सुरुवात केली.

मेघांचा पराक्रम जिरून गेला. ते दुःखानें आरडाओरड करून रडूं लागले. त्यांच्या हृदयाचें पाणी पाणी झालें.

ते नम्रपणें सूर्यकिरणाला म्हणाले,

" आम्ही जातों पृथ्वीवर. तिच्या तापलेल्या हृद्याला आम्ही थंड



करतों. आम्ही नाहीं वर जात. आम्हांला आतां मारूं नको. ह्या वेदना सहन होत नाहींत आम्हांला ! "

" जा लवकर. " किरण एक फटकारा मारून म्हणाला.

'सर–सर–सर' पृथ्वीवर पाऊस पडूं लागला.

तापलेली पृथ्वी थंड झाली. तिचें व्याकुळ हृदय शांत झालें. तिच्या अंगाची आग–तगमग नाहींशी झाली.

ती आनंदानें हसूं लागली. तिनें सुंदर कपडे अंगावर घातले. तऱ्हेतऱ्हेचे दागिने अंगावर घातले. हिरवा हिरवा शालू नेसून तिनें भक्तिभावानें सूर्यदेवाला वंदन केलें.

अजूनही मेघांचा अवखळपणा कमी झालेला नाहीं. मधून मधून ते उच्छृंखल बनतात.

आणि तो दिव्य किरण खट्याळ मेघांना ताळ्यावर आणण्याचें काम अजूनही करीत असतो.



त्याला हातपाय नव्हते.

तो हसत नव्हता. बोलत नव्हता. हालचाल करीत नव्हता. कित्येक वर्षें तो एकाच ठिकाणीं पडून होता.

त्याच्या भोंवतालचें सारें जग आनंदांत होतें.

त्याच्या जवळून एक नदी वाहात होती. ती सारखी हसत नाचत असे. ओरडत असे. आनंदानें बेभान होऊन सर्वांना वेडावीत धावत असे.

त्याच्या आजूबाजूला कितीतरी लतावृक्ष वाढत होते. वेली वृक्षांना कवटाळीत होत्या. वृक्ष वाऱ्यावर डोलत होते. त्यांच्यावरचीं फुलें—! वारा त्यांना हसवीत असे. सूर्यकिरणांबरोबर तीं लपंडाव खेळत असत. चित्रविचित्र कपडे घालून तीं मिरवीत असत. आपला मधुर सुवास पसरवून तीं सर्वांना आनंद देत. पांखरांना आपल्याबरोबर खेळायला बोलावीत.

पाखरें येत. वृक्षलतांवर नाचत. आपल्या गोड आवाजांत गात. सगळें रान मधुर स्वरांनीं भरून टाकीत.

रानचीं जनावरें त्याच्याभोंवतीं नाचत, खेळत. हरणें मुरडून धावपळ करीत. ससे तुटणाऱ्या ताऱ्यासारखे वेगानें धावत जात. मृदु तृणशय्येवर वासरें बागडत.

कितीतरी माणसें तेथें येत. गाणाऱ्या पाखरांच्या सुस्वर स्वरांनीं वेडावून देहभान विसरून त्यांचें गायन तीं ऐकत. वृक्षलतांचीं सुंदर फुलें गोळा करीत. नदीच्या पाण्यामध्यें विहार करीत.

त्याच्या भोंवतालचें सगळें जग आनंदांत होतें.

त्या जगाचा विकास होत होता.

लहान वाटणारे लतावृक्ष वाढत होते. कळ्यांचीं फुलें होत होतीं.

लहान पिलें मोठीं होत होतीं. वासरें वाढत होतीं.

क्षीण दिसणारी नदी फुलून थैमान घालीत होती.

पण त्या काळ्या शिलाखंडावर कांहींच परिणाम होत नव्हता.

तो अगदीं स्तब्ध पडून होता.

सूर्यकिरणांनीं त्याचें अंग होरपळून निघे. जलधारा त्याला झोडपून काढीत. वारा सारखा त्याला थपडा मारी. पण तो तें सर्व मुकाट्यानें सहन करी.

कित्येक वर्षें गेलीं. शतकें गेलीं. त्याच्यांत कांहींच बदल झाला नाहीं.

भोवतालचें सारें जग बदलत होतें. जुनीं पांखरें जाऊन नवीं येत. जुने वृक्ष नष्ट होऊन नवीन कोवळे वृक्ष डोलूं लागत.

नदी बदलत होती. माणसें बदलत होतीं. पाखरें बदलत होतीं.

पण त्याच्यामध्यें बदल होत नव्हता.

भोंवतालचें जग बदलत होतें. त्याला वाटलें, आपल्यामध्येंही बदल होईल.

त्यानें आशेनें भोंवतीं पाहावें.

रोज उगवणाऱ्या सूर्याकडे तो पाही. सकाळीं सौम्य भासणारा सूर्य दुपारीं प्रखर तेजानें तळपत असे. संध्याकाळीं गुलाल उधळीत तो झोंपावयास जाई.

चंद्र उगवला, कीं त्याच्या हृदयांत आशा उसळत असे. केव्हां चंद्र सारखा वाढत असे; केव्हां तो आपलें अंग दुमटून लहान होत असे. त्याच्यांत सारखा बदल होई.

पण त्या काळ्या फत्तरांत कांहीं बदल होईना. त्याच्याकडे कोणीच लक्ष देत नव्हतें.

एखाद्यानें त्याच्याकडे पाहिलेंच, तर तो तोंड फिरवीत असे. काळा कुळकुळीत रंग ! ओबडधोबड शरीर ! सर्व त्याची हेटाळणी करीत.

त्याला संताप आला. संतापानें तो काळानिळा झाला. त्याचा मूळचा काळा रंग जास्तच काळा झाला.

त्यानें पृथ्वीला विचारलें, "आई, हीं तुझीं मुलें पाहा ! त्यांच्यांत सारखा बदल होत आहे. ते हालतात, चालतात, डोलतात, आनंदानें नाचतात. मी मात्र तसाच पडून आहें. मला कांहींच करतां येत नाहीं. माझ्याकडे कोणी ढुंकूनही पाहात नाहीं. माझ्या रंगाकडे पाहून सर्व माझी हेटाळणी करतात. तुला सर्व मुलें सारखींच. मग माझीच अशी दशा कां असावी ? मी तुला आवडत नाहीं, होय ?"

"नाहीं बाळ, मला तर सर्वच सारखे ! तुझी अशी दशा पाहून मला वाईट का वाटत नाहीं ? मला दुःख का होत नाहीं ? पण तुझें नशीबच तसें ! देवानें तुझ्या नशिबांत लिहिली, तशी स्थिति तुला प्राप्त झाली. देव ठेवील तसें सर्वांना राहावें लागतें."

"देवानें माझीच अशी दशा कां करावी ?"

"बाळ, तें मला कसें सांगतां येईल ? देवालाच तें विचारलें पाहिजे."

"कोठें भेटेल देव ?"

"त्याची भक्ति केली, प्रार्थना केली, कीं तो प्रसन्न होतो व भेटतो."

त्यानें देवाला भेटायचें ठरवलें. तो देवाची भक्ति करूं लागला. त्याला एकच ध्यास लागला. त्यानें तपश्चर्या सुरू केली.

कित्येक वर्षे तो तपश्चर्या करीत होता. हजारों वर्षे लोटलीं. त्याची तपश्चर्या एकसारखी चालूच होती.

त्याच्या तपश्चर्येनें देव संतुष्ट झाला.

त्यानें त्याला दर्शन दिलें.

देव हसत त्याला म्हणाला, "किती घोर तप केलंस तूं! मी तुझ्यावर प्रसन्न झालों आहें. काय पाहिजे तुला?"

"देवा, तूं माझें मन जाणतोसच. हें माझ्या भोंवतालचें जग पाहा. सर्व आनंदांत नाचतात, डोलतात. माझ्यांत कांहींच बदल नाहीं. सर्व माझी हेटाळणी करितात. माझ्याकडे पाहून नाक मुरडतात. तूं माझी अशी स्थिति कां केलीस? मलाच अशी वाईट दशा कां मिळाली? तुझ्या हातांत सर्व आहे, तूं सर्वांचें नशीब बनवतोस. कां मला असें ओंगळ रूप दिलेंस? कां मला कवडीमोल बनविलेंस?"

"मी आतां तुझ्यावर प्रसन्न झालों आहें. तुला काय पाहिजे तें सांग. तुला फुलांसारखें कोमल रूप पाहिजे का? त्यांच्या-सारखाच सुवास तुझाही पसरायला पाहिजे का? माणसासारखी बुद्धि तुला पाहिजे का? नदीसारखी चपळ गति हवी का सांग. पाखरांप्रमाणें तुला हवेंत नाचावयाचें आहे का? ताऱ्याप्रमाणें आकाशांत चमचम करावें अशी का तुझी इच्छा आहे? सूर्यासारखें प्रखर तेज तुला पाहिजे, कीं चंद्राप्रमाणें शीतल सौम्य आल्हाददायक रूप तुला पाहिजे?"

“ मला ह्यांतलें कांहीं नको. ह्या सर्व गोष्टी तूं देतोस ! तुझी एवढी विलक्षण सत्ता आहे ना ? मग मला तुझेंच रूप दे. मला देवपण मिळालें पाहिजे. तूं मी एक झालों पाहिजे. तुझें रूप, तुझें सामर्थ्य, सर्व .... सर्व माझ्यांत आलें पाहिजे. मग कोणी माझी हेटाळणी करणार नाहीं. कोणी मला ओंगळ समजणार नाहीं. तुझ्याप्रमाणें सर्व मला मानतील. ”

“ ठीक आहे. तुला देवपण मिळेल. पण त्यापूर्वीं तुला भयंकर दिव्य करावें लागेल. प्रथम तुझ्या देहाचे तुकडे तुकडे होतील. मग तुला देवपण येईल. तयारी आहे का तुझी ? ”

“ इतकीं वर्षें एवढी कठोर तपश्चर्या केली. सारें सारें मुकाट्यानें सहन केलें. कां केलें मीं एवढें ? देवपण मिळत असेल, तर देहाचे तुकडे तुकडे झाले तरी काय हरकत आहे ? देवकळा प्राप्त होण्याकरतां वाटेल त्या हालअपेष्टा सहन करण्याची माझी तयारी आहे. ”

देवाच्या ठिकाणीं एक शिल्पकार दिसूं लागला. त्याच्या हातांत तीक्ष्ण हत्यारें लखलखत होतीं. त्यानें त्या शिलाखंडाचे तुकडे तुकडे केले. त्यांतल्या एका तुकड्यावर त्यानें आपलीं हत्यारें चालविलीं. हळुहळू त्या शिळेंतून एक सुंदर मूर्ति प्रगट होऊं लागली.

शिळेला देवकळा प्राप्त झाली.


तिची मंदिरांत स्थापना झाली.

नदी तिच्या चरणांचें आपल्या पाण्यानें प्रक्षालन करूं लागली. पांखरें तिचीं स्तोत्रें गाऊं लागलीं. लतावृक्ष आपलीं फुलें, फळें आदरानें तिच्या शिखरावर उधळूं लागले. माणूस भक्तीनें तिला वंदन करूं लागला.

शिलाखंडाची तपश्चर्या सफल झाली. देवमूर्ति सर्व जगाकडे



प्रसन्नतेनें पहात व गोड हसत परमेश्वराच्या रूपाची साक्ष पटवूं लागली.



गर्जना करीत नदी धावत होती.

तिच्या मार्गांत डोंगराचे कडे आले. तिनें हसत हसत त्यांवरून उड्या मारल्या.

दऱ्याखोऱ्यांनीं तिला कोंडायचा प्रयत्न केला. त्यांना वेडावीत नाचत, हसत, गात ती पुढें गेली.

मोठमोठे वृक्ष तिला अडवायला तिच्यापुढें उभे राहिले. त्यांचा अभिमान तिनें धुळीला मिळविला. मुळासकट उपटून तिनें त्यांना आपल्याबरोबर चालविलें.

तिची गर्जना ऐकून रान थरारत होतें. जें जें मार्गांत येईल, त्याला त्याला ती आपल्या पायांशीं नमवीत होती व आपल्याबरोबर नेत होती.

तिच्या ओघाबरोबर एक लहानशी आंब्याची कोय वाहात जात होती.

ती घटकेंत खडकावर आदळे; घटकेंत दूर फेकली जाई; घटकेंत भोंवऱ्यांत सांपडे.

तिच्यांतला लहानसा जीव अगदीं कासावीस झाला.

नदीचें उग्र रूप पाहून तो घाबरला होता.


प्रचंड शिलाखंडांना तिनें त्याच्या नजरेसमोर तुडविलें होतें. मोठमोठ्या वृक्षांची दशा त्यानें डोळ्यांनीं पाहिली होती. आपल्याकडे ती कसें लक्ष देणार? आपला क्षीण आवाज तिच्या कल्लोळांत तिच्या कानांवर कसा जाणार? तिनें आपली हाक ऐकली तरी ...

पण त्याला जरा धीर आला. नम्रपणानें वाकणारें लव्हाळें त्यानें पाहिलें. लव्हाळ्याचा विनय पाहून नदी हसली. तिनें त्याला गोंजारलें. हळूच थोपटलें. हसत हसत कुरवाळीत तिनें त्याचा मुका घेतला.

कोयींतील चिमण्या जीवाच्या हृदयांत आशा पालवली. तो काकुळतीनें नदीला म्हणाला, "नदीताई, नदीताई, अंग ठेंचाळलें ग! अगदीं कासावीस झाला बघ जीव! जरा हळू घेऊन चल ना मला!"

"बाळ, थकलास का? अन् घाबरलास का रे! वेडा!" गोड स्वरांत नदी त्याच्या कानांत गुणगुणली.

"नदीताई, फार थकलों मी. अगदीं व्याकुळ झालों बघ किती वेगानें धावतेस तूं! थांब ना जरा! जरा विसांवा घेऊं येथें!"



"मला नाहीं थांबतां येणार बाळा! तूं थांबतोस येथें?"

"ताई, मी एकटा ........"

"अहा रे वेड्या, मी आहें ना जवळच. ही पाहा कशी मऊ मऊ माती मीं आणली आहे. तिचा सुंदर बिछाना होईल माझ्या बाळाला. मग खडकावर आपटायला नको तुला. या माझ्या कांठावर तूं राहा. माझें पाणी मी तुला पाजीन. मातीचा रस काढून तो तुला खायला देईन. तुला झोप यावी म्हणून अंगाई गीत गाईन. तुझ्यावर जागता

पहारा करीन. माझ्या जलतुषारांनीं तुला स्नान घालीत जाईन. मग तूं मोठा होशील बरें बाळ!"

आंब्याची कोय तेथेंच कांठावर राहिली. तिच्यांतील लहानगा जीव मातीच्या मऊ बिछान्यावर आनंदानें पहुडला. नदीचें अंगाईगीत ऐकतां ऐकतां त्याला झोप लागली. कांहीं दिवस तो गाढ झोपेंत होता.

एके दिवशीं त्यानें डोळे उघडले. आपल्या चिमण्या घरांतून तो हळूच बाहेर पडला. भोंवतालचें मनोहर जग पाहून त्याला फार आनंद झाला. सूर्यकिरणांबरोबर तो हसूं खेळूं लागला. वाऱ्याबरोबर रात्रंदिन नाचूं लागला.

मातीचा रस खाऊन व नदीचें पाणी पिऊन तो वाढूं लागला.

उन्हाळा आला. नदीजवळ अगदीं थोडें पाणी राहिलें. आंब्याला पाणी मिळेना. त्याचीं कोवळीं पानें सुकूं लागलीं. त्याचें तोंड उतरलें.

त्याला वाटलें, नदीताई रागावली.

"ताई, रागावलीस होय! तूं मला आतां कुरवाळीत नाहींस. तुझें अमृतासारखें पाणी देत नाहींस." तो म्हणाला.

"नाहीं रे बाळ, मी तुझ्यावर कधीं रागावेन का वेड्या? आपण आतां गरीब झालों आहोंत. मजजवळ फार थोडें पाणी आहे. पण तीं पाहा तान्हेलीं माणसें माझें पाणी पीत आहेत. तीं गुरें पाहा! माझें पाणी पिऊन कशीं आनंदानें उड्या मारीत आहेत. तीं गोड पाखरें पाहा. पाणी प्यावयास मिळाल्यामुळें आनंदानें कशीं नाचत आहेत! मजजवळ थोडेंसें पाणी असलें, तरी मी कधीं कुणाला नको म्हणत नाहीं. मग तुला कां नको म्हणेन? तुला कां सुकूं देईन! मी जिवंत आहें, तोंपर्यंत सर्वांना जीवन देईन. घाबरूं नकोस. तुझ्या मुळ्या माझ्याकडे वळव. अगदीं माझ्या कुशींत ये. तुला जगण्याइतकें पाणी मी देईन. त्यांतच मला समाधान आहे."

आंब्यानें आपल्या मुळ्या नदीकडे वळविल्या.

त्याला नवजीवन लाभलें. त्याचा चेहरा फुलला. त्याला नवीन पालवी आली. तो जोमानें वाढूं लागला.

त्याच्याकडे पाहून नदीचें हृदय आनंदानें नाचूं लागे. ती त्याला प्रेमानें कुरवाळी. त्याला भेटून सारखी कुजबुजत राही व आपलें हृदय त्याच्याजवळ मोकळें करी.

"नदीताई, किती किती चांगली आहेस तूं! तूं नसतीस तर मी कोठें असतों ग!"

"असें म्हणूं नये बाळ. जें करतां आलें तें मीं केलें. आपल्याला जें करतां येईल तें करावें व दुसऱ्याला सुख द्यावें."

"नदीताई, मी माझीं फुलें तुला देईन, माझीं फळें तुला देईन. घेशील ना?"

"घेईन कीं! पण बाळ, मला त्यांचा काय उपयोग आहे? तूं आपलीं फळें भुकेल्या जीवांना दे. त्यांना त्यांचा अधिक उपयोग होईल! ते सुखी होतील.


उन्हानें झाडें सुकतात. पाखरांना विसाव्याला जागा नसते. तुझ्या दाट सावलींत त्यांना खेळूं दे. तुझ्या फुलांच्या सुवासानें आनंदून ते नाचूं लागतील. कोकिळा गाऊं लागेल.

थकून भागून आलेल्या जीवांना तुझ्या गार छायेंत बसूं दे. त्यांचे श्रम दूर होतील. त्यांना उत्साह वाटेल. त्यांना आनंदी पाहून तुलाही आनंद होईल. मलाही आनंद होईल."

"ताई, किती थोर मन आहे तुझें! तुझ्या सांगण्याप्रमाणें मी वागेन. जें जें दुसऱ्याकरितां करतां येईल तें तें करीन अं मी!"

"माझं गुणांचं बाळ." नदीनें प्रेमानें त्याचा मुका घेतला.

# काळें सोनें



एक लोखंडाचा तुकडा होता तो. जातां येतां किती तरी लोक त्याला ठोकरीनें उडवीत. किती तरी प्राणी त्याला पायांखालीं तुडवीत.

कोणी त्याच्याकडे लक्ष देत नसे. कोणी त्याची पर्वा करीत नसे.. आणि लोकांनीं त्याच्याकडे लक्ष तरी कां द्यावें ?

त्याच्यामध्यें काय सौंदर्य होतें ? त्याच्यामध्यें काय आकर्षकता होती ? त्याच्यामध्यें का माधुर्य होतें का कोमलता होती ?

त्याचे भाऊ किती सुंदर होते. सोन्याचा उज्ज्वल पिवळा रंग पाहून माणसाचे डोळे हसत असत. चांदीच्या सळसळणाऱ्या पांढऱ्या रंगानें ते चमकत असत. तांब्याच्या मजेदार लाल रंगानें ते खुलत असत.

याचा रंग मात्र कळकट काळा. कोणीं कसें लक्ष द्यावें त्याकडे ?

आपल्या भावांचें सौंदर्य पाहून तो लाजेनें थिजत असे. त्याला फार वाईट वाटे.

आपल्या गुणांनीं आपली उणीव दूर करण्याचा त्यानें निश्चय केला. सर्वांच्या उपयोगीं पडावयाचें ! खूप खपावयाचें ! जितकें दुसऱ्याकरितां करितां येईल तितकें करावयाचें, असें त्यानें ठरविलें.

मनुष्याचें जें जें काम करितां येईल तें तें काम लोखंड मोठ्या उत्साहानें करूं लागलें. त्याला सुख देण्याकरितां, त्याचें रक्षण करण्याकरितां तें झिजूं लागलें.

माणसाला अन्नाची अत्यंत जरूरी ! तें अन्न तयार करायला तें माणसाला मदत करूं लागलें. नांगराकरितां लोखंडाचे फाळ बनवून माणूस जमीन नांगरूं लागला. तो विळ्या कोयत्यांनीं कापणी करूं लागला. गाडीच्या चाकांवर त्यानें लोखंडी धावा बसविल्या. घरास बळकटी आणण्याकरितां लोखंडाच्या खिळ्यांचा उपयोग होऊं लागला. लोखंडाच्या मदतीशिवाय धान्य पिकवणें माणसाला अशक्य झालें.

कपड्याशिवाय माणसाचें चालत नाहीं. कापड तयार करण्याकरितां लोखंड मदत करूं लागलें. कपडे तयार करण्याला तें उपयोगीं पडूं लागलें. लहानशी सुई, पण तिच्याशिवाय कपडे शिवणें अशक्य झालें.

शत्रूपासून व रानटी जनावरांपासून रक्षण करण्याच्या कामांत तें माणसाला मदत करूं लागलें. माणसानें लोखंडाचीं अनेक प्रकारचीं हत्यारें बनविलीं. तलवार, भाला, बंदुका या हत्यारांनीं मनुष्य शत्रूंचा व रानटी पशूंचा नाश करूं लागला. लोखंडाच्या मदतीशिवाय स्वतःचें रक्षण करणें माणसाला अशक्य वाटूं लागलें.

माणसानें सर्व यंत्रें लोखंडाचींच बनविलीं.

आपल्या भावांच्याही तें उपयोगीं पडूं लागलें. भावांचें रक्षण करण्याचें काम त्यानें अंगावर घेतलें. त्याचें कवच पांघरून त्याचे भाऊ स्वस्थ झोप घेऊं लागले.

पण त्याच्या ह्या सर्व प्रयत्नांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. माणसाकरितां तें इतकें झटूं लागलें, पण. माणूस कांहीं त्याला फारशी किंमत देईना.

ज्या आपल्या भावांकरितां तें खडा पहारा करीत असे, ते त्याचे भाऊ दिमाखानें त्याच्याकडे पाहून हसत. त्याला पहारेकरी समजत.

त्याच्या जिवावर आपण मजेंत स्वस्थ पडून राहतों, हें विसरून त्याची थट्टा करीत.

त्याला फार वाईट वाटूं लागलें.

शेवटीं आपलें गाऱ्हाणें घेऊन तें देवाकडे गेलें.

"देवा, ह्या माणसांच्या मी किती उपयोगी पडतों ! माझ्याशिवाय त्यांचें घटकाभरही चालत नाहीं. पण मला तीं कांहींच महत्त्व देत नाहींत. माझ्या भावांचा त्यांना कितीसा उपयोग होतो ? पण त्यांना त्यांचेंच फार महत्त्व वाटतें. किती उपयोग होतो सोन्याचा त्यांना ? रुपें असें काय त्यांच्या कामीं येतें ? पण तीं त्यांना किती किंमत देतात ! माझा त्यांना इतका उपयोग होत असूनही मला तीं अगदीं क्षुद्र कां मानतात ?"

"बाळ," देव म्हणाले, "माणसाला तुझ्याइतका सोन्याचा उपयोग नाहीं हें खरें, पण उपयोगावरून वस्तूची किंमत करावयाची असते हें माणसाला कळत नाहीं. तो सोन्याला मोल देतो ही त्याची चूक आहे. पुढें त्याला ही चूक कळून येईल व तुला तो योग्य मान देऊं लागेल."

"मी इतका माणसाकरितां झटतों, तरी तो मला किंमत देत नाहीं. सोन्यालाच खूप महत्त्व देतो तो ! देवा, माझें सोनें करून टाक ना ! माझें सोनें झालें तरी मी असाच वागत जाईन."


देव गालांतल्या गालांत हसले.

त्यांनीं परीस निर्माण केला.

"बाळ," देव म्हणाले, "हा पहा परीस ! ह्याचा तुला स्पर्श होतांच तुझें काळें रूप नाहींसें होईल. तुझें सोनें होईल."

लोखंडाच्या सुईला देवानें परीस लावला. ती सोन्याची झाली. लोखंड हसूं लागलें.


हसतांना त्याला थांबवून देव म्हणाले,



“ ही गोरगरिबांपासून राजापर्यंत सर्वांच्या उपयोगी असणारी सुई आतां निरुपयोगी झाली आहे. आतां ही एखाद्या श्रीमंत माणसाच्या पेटींत अडकून पडेल.

“ हे तुझे खिळे, हे भाले, हीं यंत्रें सोन्याचीं झालीं, तर यांचा कोणालाही उपयोग होणार नाहीं. हे पाहा, लहान लहान घरांत राहणारे लोक ते पलीकडचे शेतकरी पाहा. यंत्रावर काम करणारीं तीं माणसें पाहा. तुझ्यामुळेंच ते सर्वजण आपलें पोट भरीत आहेत. सुखानें राहात आहेत.

पण ह्यापुढें तुला महालांत राहाणाऱ्या थोड्या लोकांच्या पेटींत अडकून पडावें लागेल. तुझ्याकरितां भांडणें होतील, खून पडतील आणि सगळीकडे सोनेंच सोनें दिसूं लागलें, कीं मनुष्य सोन्याला तरी काय मोल देणार ? तुझी आजची किंमत सुद्धा तुला मिळणार नाहीं.



बोल, तुला अडकून पडायचें आहे का ? तुझ्याकरितां माणसांनीं एकमेकांशीं भांडावें, असें तुला वाटतें का ? लाखों लोकांच्या उपयोगी पडण्यापेक्षां मूठभर लोकांच्या हातांतील खेळणें होणें, तुला आवडेल का ? ”

" नको नको, देवा ! मी लोखंड आहें, तेंच ठीक आहे. तो परीस नाहींसा करून टाका. मी ह्या लाखों लोकांकरितां पूर्वीं-प्रमाणेंच झटत राहीन. तें चकाकणारें पिवळें सोनें काय कामाचें ! "

" छान ! त्या पिवळ्या सोन्यापेक्षां तूंच श्रेष्ठ आहेस. तूं सर्वांजवळ राहाशील. तुझ्यावांचून कोणाचेंही चालणार नाहीं. सर्व लोक तुला काळें सोनें म्हणून मान देतील; तुझें महत्त्व ओळखतील; तुझी उपेक्षा करणार नाहींत. तुझ्या प्राप्तीकरितां धडपड करतील हा माझा तुला आशीर्वाद आहे.

देवानें परीस नाहींसा केला. तेव्हांपासून ' परीस ' हें नांव फक्त शिल्लक राहिलें.

आणि लोखंड ! सर्व धातूंमध्यें लोखंड अधिक महत्त्वाचें, अधिक श्रेष्ठ आहे हें माणसाला कळून आलें. सोन्यारुप्यावांचून त्याचें कांहींच अडत नाहीं, पण लोखंडावांचून त्याचें क्षणभरहि चालणार नाहीं. तें अत्यंत उपयोगी आहे हें त्याला पटलें. शहाणा मनुष्य म्हणतो, " सर्व धातूंचा राजा लोखंड – काळें सोनें आहे. "

# पांढरा कागद



ते सारे भाऊ भाऊ होते.

पण किती फरक होता त्यांच्यामध्यें! त्यांतील कांहीं जास्वंदीच्या फुलासारखे लाल होते. कांहीं सोन्यासारखे पिवळे होते. कांहींचा रंग आकाशासारखा निळा होता. कांहीं पोपटासारखे पिवळे होते. कांहींना जणुं गुलाबाच्या फुलांचाच रंग दिला होता. कांहीं मात्र अगदीं पांढरे होते.

पांढऱ्या कागदाशिवाय प्रत्येकाला आपल्या रंगाचा फार अभिमान वाटत असे.

लाल कागद म्हणे, " किती सुंदर रंग आहे माझा! पळसाच्या फुलांपेक्षांही मी जास्त लाल दिसतों. "

हिरवा कागद म्हणे, " माझा रंग कसा मजेदार आहे! साऱ्या झाडांचीं पानें माझ्यासारखींच हिरवीं आहेत! "

पिवळा कागद म्हणे, " मी किती छान दिसतों! सोन-चांफ्याच्या फुलासारखा रंग कोणाला आवडणार नाहीं! "

निळा कागद पुढें सरसावून म्हणे, " माझ्याकडे तर पाहा! सर्व आकाश माझ्यासारखें आहे. समुद्रही माझ्यासारखाच आहे! "

आणि मग सारे नाक मुरडून म्हणत,

" हा पांढरा कागद आपला भाऊ? ह्याला ना रंग ना रूप. आम्ही किती सुंदर दिसतों! आपल्याला लाज वाटते ह्याला भाऊ म्हणायची! "

विचारा पांढरा कागद! त्याला मजेदार रंग नव्हता, सुंदर रूप नव्हतें.

नेहमीं अशा प्रकारचें भावांचें बोलणें ऐकून त्याला फार वाईट वाटे. आणि एकदां तर त्याच्या भावांना त्याची थट्टा करायला एक विशेष कारण घडलें.

एक मनुष्य तेथें आला. त्यानें सर्व कागदांकडे हसत हसत पाहिलें. पांढरा कागद ओढून त्यानें जवळ घेतला, दऊत उघडली आणि आपल्या लेखणीनें भरभर त्यावर कांहींतरी लिहिलें.

कागदाचा पांढरा रंगही धड राहिला नाहीं. काळ्या निळ्या शाईनें त्याचें गोरें तोंड काळें निळें झालें, तो अधिकच वाईट दिसूं लागला.




त्याचें तें चमत्कारिक ध्यान पाहून इतर कागद त्याला हसूं लागले; त्याची चेष्टा करूं लागले; त्याला हिणवून टोचूं लागले.

त्या माणसाच्या एका मित्रानें तो पांढरा कागद पाहिला. त्यावर लिहिलेली सुंदर गोष्ट वाचून त्याला फार आनंद झाला. त्यानें तो आपल्या मित्रांना दाखविला. सर्व लोक मोठ्या प्रेमानें व आवडीनें त्यावर लिहिलेली गोष्ट वाचूं लागले.

किती आनंद झाला त्यांना ती वाचून ! सर्वजण त्याला प्रेमानें जवळ घेऊं लागले. त्यांचा आनंद पाहून पांढऱ्या कागदालाही आनंद झाला.

टेबलावरचे रंगीत कागद त्या पांढऱ्या कागदाकडे आशाळभूतपणानें पाहात असतात, पण आतां त्यांच्याकडे कोणी ढुंकूनही पाहात नाहीं.

---



# नवीन

नवीन हें त्या तरुणाचें नांव.

त्याच्या अंगांत उत्साह सळसळत होता.

त्याच्या नसानसांतून शक्ति खळाळत होती.

त्याच्या रक्तांतील कणकण तेजानें उसळत होता.

त्याला प्रवासाची फार आवड होती.

अनेक गांवें त्यानें पाहिलीं होतीं.

नाना प्रकारच्या देशांतून तो फिरला होता.

पण कोठेंही घर करून राहावें असें त्याला वाटलें नाहीं.

ज्या ज्या ठिकाणीं तो गेला, तेथें तेथें त्याला दु:खच दिसून आलें. प्रत्येक ठिकाणीं दु:खी-कष्टी लोक त्याला आढळले. प्रत्येक ठिकाणीं थोड्याशा फायद्याकरितां एकमेकांच्या नरडीचा घोट घेणारे लोक त्याला दिसले. कांहीं ठिकाणीं युद्धें चालू होतीं. प्रत्यक्ष लढणारांना आपण कशाकरितां लढतों हेंही ठाऊक नव्हतें. अन्नावांचून तडफडणारे, भाकरीच्या तुकड्याकरितां वाटेल तें करावयास तयार होणारे असंख्य दीनदुबळे जीव पाहून त्याचें हृदय व्याकुळ होत असे. त्याच्या डोळ्यांत अश्रु जमा होत.

माणसानें केलेले भेद पाहून त्याला फार वाईट वाटे.

हा श्रेष्ठ, तो कनिष्ठ. हा थोर, तो क्षुद्र. हा मालक, तो सेवक!

सगळीकडे विषमभाव. ह्याची सेवा त्यानें करावी. ह्याला थोर समजून त्याची पूजा सर्वांनीं करावी. ह्याच्याजवळ इतके सेवक

आहेत ! ह्या राजाचें राज्य एवढें मोठें आहे! त्याची सर्व प्रजा त्याच्या आज्ञा पाळण्यांत तत्पर आहे! तो मोठा स्वामिनिष्ठ आहे!

असा उच्चनीच भाव त्याला सर्वत्र आढळला. त्यामुळें त्याचा जीव अतिशय उबगला.

ह्या अशा लोकांपासून दूरदूर जाण्याचें त्यानें ठरविलें.

एका खेड्यांत त्याला त्याच्या विचाराची एक तरुणी आढळली.

आशा होतें तिचें नांव. पण सर्व जगांत निराशा भरलेली आहे असें तिला वाटत होतें. ती एका गरीब शेतकऱ्याची मुलगी होती. तिच्या बापाजवळ एक लहानसें शेत होतें. पण तें शेत सावकारानें हिरावून घेतलें होतें. तिचे आईबाप अन्न अन्न करीत तडफडून मेले होते. तिच्या भावांना लढाईवर जावें लागलें होतें. ते कोठें होते? जिवंत होते कीं मेले होते? तिला कांहींच ठाऊक नव्हतें.

नवीन तिच्या दुःखानें तळमळला. तो विचार करूं लागला. खूप विचार केल्यावर त्याच्या मनांत एक कल्पना आली. त्यानें आशेला आपली कल्पना सांगितली. तिला ती आवडली.

त्यांचे विचार जुळले. त्यांनीं एक बेत ठरविला.

नवीन आशेला घेऊन एका माळरानांत गेला. खूप मोठें माळरान होतें तें. त्यानें त्याच्या मध्यभागीं एक लहानसें खोपट तयार केलें. जवळचाच जमिनीचा एक मोठा तुकडा त्यानें निवडला. त्या ठिकाणीं वाढलेलीं झाडेंझुडपें त्यानें तोडून टाकलीं. त्यांचीं जमिनींत खोल गेलेलीं मुळें त्यानें उपटून फेकून दिलीं. सर्व जमीन नांगरून तयार केली. ह्या सर्व गोष्टी करण्याकरितां त्याला खूप श्रम करावे लागले.

तो सकाळपासून संध्याकाळपर्यंत सारखा काम करीत राही. आशा प्रत्येक कामांत त्याला मदत करी.

संध्याकाळीं तो काम करून घरीं आला, कीं अगदीं गळून जात असे. त्या वेळेस ती त्याचे श्रम दूर करण्याचा प्रयत्न करी. साधी भाजीभाकरी ती तयार करीत असे. पण तिच्या हाताला अशी गोडी होती, कीं तिच्यापुढें पंचपक्वान्नें तुच्छ वाटावीं ! गोड गोड गोष्टी सांगून ती त्याला आनंदित करीत असे. त्याचा थकवा सहज दूर होई. मग उत्साहानें तो आपल्या मनांतील योजना तिला समजावून सांगे. त्याचें शिणलेलें डोकें मांडीवर घेऊन ती अशा हळुवारपणें थोपटीत असे, कीं एका क्षणांत त्याचा सर्व शिणवटा नाहींसा होई. त्याला गाढ झोंप लागे आणि पुन्हा जेव्हां तो जागा होई, तेव्हां पूर्वीपेक्षांही अधिक उमेदीनें व उत्साहानें त्याच्या देहांतला कणन् कण फुललेला असे.

त्याच्या शेतांत त्यानें अनेक फळझाडें लावलीं. निरनिराळीं धान्यें पेरलीं. थोड्याच दिवसांत त्या शेताचा सुंदर मळा बनला.

दूरदूरचीं पांखरें येऊन मळ्यांतील वृक्षांवर मधुर गायन करूं लागलीं. फळाफुलांनीं धनधान्यानें डोलणाऱ्या त्या मळ्याकडे पाहून त्या प्रदेशांतून जाणाऱ्या प्रवाशांना मोठा आनंद होऊं लागला.

कांहीं लोकांनीं तेथें राहाण्याची इच्छा दाखविली. नवीननें आनंदानें त्यांना तेथें ठेवून घेतलें. त्यांच्या मदतीनें त्यानें आणखी मळे तयार केले. प्रत्येकाकरितां त्यांनीं झोपड्या बांधल्या.

एका झोपडीच्या ठिकाणीं अनेक झोपड्या झाल्या. एक लहानसें गांवच झालें तें. नवीननें आपल्या गांवाचें नांव 'आशापुर' असें ठेविलें.

आणखीही लोक तेथें आले. सर्वांची व्यवस्था नवीननें केली. दीनदुबळे लोक आले. त्यानें त्यांना झेपेल, त्यांच्याकडून होईल असें काम त्यांना दिलें.

सर्वांना पोटभर अन्न तेथें मिळूं लागलें. नवीन पूर्वींप्रमाणेंच सकाळपासून संध्याकाळपर्यंत काम करीत असे. पण आतां त्याच्या कार्यक्रमांत थोडा बदल झाला होता.

दुपारीं जेवणापूर्वीं तो एकदां आपल्या गांवांतून फेरी टाकीत असे. सर्वांचें जेवण झालेलें पाहिल्यावर तो जेवायला बसे. कोणी उपाशी असल्यास त्याला तो आपल्याबरोबर जेवावयास बोलवी. कोणी प्रवासी आला असल्यास त्याला पोटभर अन्न मिळालें कीं नाहीं हें तो पाही.

खूप श्रम करावे. दिवसभर शेतांत राबावें. एकमेकांना मदत करावी. सुकी कोरडी भाकरी जी असेल ती सर्वांनीं खावी.

एवढेंच त्या लोकांना माहीत होतें.

तेथें कोणी कोणाचा द्वेष करीत नव्हता. कोणी कोणाचा हेवादावा करीत नव्हता. आपल्याकडून होईल तें काम करावें. जितकें करतां येणें शक्य असेल तितकें काम करावें. साधें, ताजें, श्रम केल्यामुळें अत्यंत रुचकर व गोड लागणारें अन्न खावें. भांडण नाहीं, तंटा नाहीं. मोठ्या मजेदार रीतीनें त्यांचे दिवस चालले होते.

अगदीं थोड्या वर्षांत त्या जागेला नमुनेदार रूप प्राप्त झालें. किती तरी लोक तेथें सुखी झाले ! किती उपाशी लोकांना तेथें अन्न मिळालें ! किती निराश्रित लोकांना तेथें आश्रय मिळाला ! किती दुःखी कष्टी लोकांना तेथें आधार मिळाला !

* * *

पुण्यशाली नवीन पृथ्वीवर राहाण्यास योग्य नाहीं. त्याला स्वर्गांत नेलें पाहिजे, असें देवेंद्राला वाटलें.

त्यानें नवीनकरितां विमान पाठविलें. त्या विमानांतून दोन देवदूत नवीनला स्वर्गांत नेण्याकरितां आले.

देवदूतांनीं नवीनला देवेंद्राची इच्छा सांगितली.

"सर्वांना सोडून स्वर्गांत यावयाचें ?" नवीननें आश्चर्यानें व कांहींशा कष्टानें विचारलें.

"होय. तुम्हांला आतां ह्या सर्वांना सोडून यायचें म्हणून दुःख होत आहे; पण एकदां तुम्ही स्वर्गांत आलां, कीं तुम्हांला यांची आठवणही होणार नाहीं. तेथें तुमचा सर्व वेळ अत्यंत आनंदांत व सुखांत जाईल. कोणालाही सहज रीतीनें स्वर्गांत प्रवेश मिळत नाहीं. तुमचें पुण्य फार असल्यामुळें देवेंद्रानें आम्हांला मुद्दाम तुमच्याकडे पाठवलें आहे. चला."

देवेंद्राच्या इच्छेमुळें नवीनला स्वर्गांत जावें लागलें. थोड्याशा नाखुशीनेंच तो स्वर्गांत गेला.

स्वर्ग पाहातांच त्याला आनंद झाला. किती व्यवस्थित! किती नमुनेदार! किती मोहक! किती सुंदर! तेथें प्रत्येक गोष्ट सौंदर्याच्या पराकोटीला पोंचलेली होती.

तेथील पुरुष सुंदर होते. तेथल्या अप्सरा सुंदर होत्या. तेथील वृक्षलता सुंदर होत्या. तेथील उत्तुंग प्रासाद सुंदर होते.

त्याला वाटलें स्वर्ग म्हणजे सौंदर्य.

नेहमीं तेथें मंद सुशीतल वारा वाहात होता. मधुर सुगंध सगळीकडे पसरला होता. तो कोणत्या फुलांचा वास होता तें ठरविणेंच कठीण होतें.

ओंगळ, कुरूप, ओबडधोबड, भीषण, बीभत्स असें कांहींच नव्हतें तेथें.

त्याला एका भव्य प्रासादांत नेण्यांत आलें. त्याच्याकरितां देवेंद्रानें तो प्रासाद तयार करविला होता.



सर्व सुखसोयी तेथें होत्या.

त्या वाड्याच्या प्रत्येक दालनांतून तो फिरला. कोठेंही कसली उणीव तेथें नव्हती.

जेवणाची इच्छा होतांच त्याच्यापुढें सर्व पक्वान्नांचें ताट वाढून आलें. तीं पक्वान्नें अमृतांत बनविलीं होतीं. प्यावयाला अमृत भरलेली झारी होती. वाढायला सुंदर अप्सरा हात जोडून उभ्या होत्या.

त्याला आनंद व्हावा म्हणून निरनिराळ्या अप्सरा निरनिराळ्या रीतीनें प्रयत्न करीत होत्या. कांहीं गात होत्या. तसें गाणें त्यानें पूर्वी कधींही ऐकलें नव्हतें. इतके मधुर स्वर गळ्यांतून निघूं शकतील ही कल्पनाही नव्हती त्याला. त्या गाणाच्या सुराबरोबर कांहीं अप्सरा नाचत होत्या. किती

तरलतेनें त्यांचीं पावलें पडत होतीं ! त्यांच्या शरिराची हालचाल अतिशय मोहक व उन्मादक होती. नृत्याला व गाण्याला सुंदर साथ होती ! त्याला वाटलें, गाण्याच्या मधुर स्वरांबरोबर आपलें हृदय विरघळून जात आहे.

विस्मयानें त्या सर्वांकडे तो पाहातच राहिला. जेवावयाचें त्याला भानही राहिलें नाहीं.

शेवटीं एका अप्सरेनें हळुच त्याच्या खांद्याला स्पर्श केला.

" जेवायचं ना ? " मधुर स्वरांत तिनें विचारलें ! तो भानावर आला. त्यानें त्या अप्सरेकडे पाहिलें. अत्यंत आर्जवी स्वरांत ती विचारीत होती,

" जेवायचं ना ? "

तिच्या स्वरांत गोडी होती. पण आशेच्या — त्याच्या पत्नीच्या आवाजांतील जिव्हाळा त्यांत नव्हता.

तिच्या विचारण्यांत तत्परता होती. पण आशेच्या शब्दांतील तळमळ त्यांत नव्हती.

तिच्या दृष्टिक्षेपांत सूचकता होती. पण त्याच्या पत्नीच्या दृष्टिक्षेपांतील आपुलकी त्यांत नव्हती.

तिची हालचाल मोहक होती. पण आशेच्या हालचालींतील जिवंतपणा तींत नव्हता.

त्याच्या इच्छेप्रमाणें वागावयाची उत्कंठा तिच्या चेहऱ्यावर दिसत होती. पण त्याच्या पत्नीच्या वागण्यांतील तन्मयता तींत नव्हती.

सारें यांत्रिक चित्रपटाप्रमाणें. सर्व गोष्टी प्रमाणबद्ध पण निर्जीव.

त्यानें कसेंतरी जेवण संपविलें. आपण काय खाल्लें हें त्याला कळलें नाहीं. पण पत्नीनें वाढलेल्या भाजीभाकरींतील माधुरी त्या जेवणाला नव्हती, एवढें मात्र त्याच्या लक्षांत आलें.

तो नंदनवनांत गेला. अतिशय सुंदर होतें तें ! कोठेंही पालापाचोळा पडलेला नव्हता. सोन्याच्या रत्नखचित कुंड्यांतून नानाप्रकारचीं झाडें फुललेलीं दिसत होतीं. कल्पवृक्षांची राई एका बाजूला डोलत होती. पारिजातकाच्या वृक्षांनीं दुसरी बाजू खुललेली होती.

तेथेंही अनेक देवदूत त्याच्या सेवेला हजर होते. त्याची आज्ञा ऐकण्याकरितां ते हात जोडून तयार होते. पण त्याला स्वतःलाच कांहीं काम करायला मिळालें नाहीं, तर तो दुसऱ्याला काय सांगणार ? सकाळपासून त्याचे हात सळसळत होते, पण कोठेंच स्वतःला करतां येण्यासारखें कांहीं त्याला दिसलें नाहीं.

आजचा त्याचा सर्व दिवस रिकामा असा गेला. त्याला वाटलें, आपली शक्ति गंजून जाईल. आपल्या शरिरांतील उत्साहाचा कण न् कण थिजून जाईल. आपल्या हृदयांतील उमेद गारठून जाईल.

येथें आपली कोणाला जरूर नाहीं.

आपल्यावांचून येथें कोणाचें अडत नाहीं.

एकमेकांना मदत करण्याची येथें आवश्यकता नाहीं.

एकमेकाच्या सुखदुःखांत सुखदुःख मानण्याचें समाधान येथें नाहीं.

कोणतीहि गोष्ट मिळविण्याकरितां श्रम करायला नको. खावें प्यावें चैन करावी. सर्व आपोआप मिळणार, आयतें मिळणार.

येथें उद्योग करायला नको. अंगांत उत्साह असण्याची जरूर नाहीं. आशा हा शब्दच येथें नाहीं. आशा कशाची करावयाची ? सर्वच जेथें मिळणार, पूर्णता जेथें आहे, केवळ इच्छेनें जेथें सर्व गोष्टी घडतात, तेथें आशा हा शब्द तरी कोठून ऐकूं येणार !

त्याच्या आशापुरांत प्रत्येकाचें हृदय आशेनें फुललेलें होतें. प्रत्येकाचें मन उमेदीनें सळसळत होतें. तेथें धडपड होती. तळमळ होती. उत्साह होता. येथें सर्व शांत.

आणि त्याला अत्यंत विषाद वाटला, तो देवदूत व अप्सरा यांच्या वागण्यामुळें.

तीं सर्व त्याच्या शब्दाच्याच नव्हे, तर भुवईच्या हालचालीच्या तालावर नाचत होतीं. त्याच्या मनांत इच्छा उत्पन्न होण्याचा अवकाश, कीं ती पूर्ण करण्याकरितां त्यांची धडपड चाले. सर्व हात जोडून याच्या सेवेला तयार होती.

त्यांच्या गुलामी वृत्तीची नवीनला चीड आली. या वृत्तीचा तिटकारा वाटून तो एका निर्जन माळरानांत राहावयास गेला होता. श्रेष्ठ कनिष्ठ भावनेचा तिरस्कार वाटून त्यानें विजनवास पत्करला होता. त्याच्याकडे येणाऱ्या प्रत्येकाच्या मनांतील ही भावना नाहींशी करण्याचा त्यानें प्रयत्न केला होता. ती भावना, ती वृत्ति येथें त्याला सर्वत्र आढळली.

आशापुरांत ते एकमेकांवर प्रेम करीत. एकमेकांकरितां वाटेल तो त्याग करावयास तयार असत.

येथें प्रेम, त्याग ह्या भावनाच कोणाला ठाऊक नव्हत्या.

स्वर्ग म्हणजे सौंदर्य असें त्याला वाटलें होतें.

आतां त्याला वाटूं लागलें,

"स्वर्ग म्हणजे निष्क्रियता. स्वर्ग म्हणजे निरुद्योग. स्वर्ग म्हणजे सेवावृत्ति, स्वर्ग म्हणजे संगमरवरी दगडाचा अत्यंत सुंदर पुतळा."

तो अत्यंत अस्वस्थ झाला.

फुलांची शय्या त्याला बोचूं लागली.

अप्सरांच्या संगतींत त्याल[illegible] लागला

अमृतांतील पक्वान्नें द[illegible] त्याला त्यांचा वीट आला.

IRBK-0103146
IRBK-0103146

तो नेहमीं खिन्न राहूं लागला.

शेवटीं त्याच्या मनाची तळमळ असह्य झाली. तो देवेंद्राकडे गेला.

"मला आशापुरांत परत पाठवा." त्यानें देवेंद्राची प्रार्थना केली.

देवेंद्राला आपल्या मनांतील खळबळ त्यानें सांगितली.

देवेंद्राजवळचे देव त्याच्या खुळेपणाला हसले. स्वर्ग सोडून पृथ्वीवर जाण्याची इच्छा करणारा मूर्ख माणूस त्यांना पहिल्यानेंच आढळला.

देवेंद्रानें त्याची समजूत घालण्याचा खूप प्रयत्न केला. पण तो फुकट गेला. त्याचा नाइलाज झाला.

नवीनला आशापुरांत पोंचविण्याची त्यानें देवदूतांना आज्ञा केली.

नवीन परत आला. तो भेटतांच त्याच्या पत्नीला किती आनंद झाला! त्याची मित्रमंडळी तर आनंदानें बेहोष झाली.

त्यांच्या डोळ्यांतून आनंदाश्रु वाहूं लागले. त्या प्रेमाच्या पाण्यानें नवीननें पाहिलेलें स्वर्गाचें चित्र धुतलें गेलें. त्याचे रंग वाहून गेले. तें चित्र अत्यंत कुरूप, ओंगळ, ओबडधोबड आहे असें त्याला वाटलें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.